नि.दि.दावा क्र.६२१ /२०२०
नि. क्र.२८

**<u>वादीतर्फे सरतपास विधीज्ञ श्री.पी.आर. मालपाणी यांच्याकडून शपथेवर सुरु</u>**

१. प्रस्तुत प्रकरणात वादीतर्फे प्रतिवादीचे वडिल सुर्यभान बाबुराव नवले यांनी ताबा दिल्याबद्दलची ताबेपावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **वस्तू 'अ'** देण्यात येते. सुर्यभान बाबुराव नवले हे वादी कारखान्यात नोकरीस होते. त्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. तसेच सदर वादी कारखान्याचे कार्यकारी संचालक वसंत सखाराम गुंजाळ हे होते. त्यांची सही सुध्दा मी ओळखतो. सदर ताबेपावतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अहमदनगर यांना परवानगीसाठी अर्ज दिला. त्याची कार्यालयीन प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर अर्ज पाठविणार म्हणून सुर्यभान बाबु नवले यांची व कार्यकारी संचालक वसंत सखाराम गुंजाळ यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात येते. परवानगी आली नाही. त्यामुळे सन २००७ मध्ये करारनामा ९९ वर्षांसाठी करुन घेतला. सदरचा करारनामा हा नोटरी ॲड. श्री.बी.जी. दिघे यांच्याकडे करण्यात आला आहे. त्यावर कार्यकारी संचालक अनिल बाबुराव शिंदे यांची सही व जमीनीचे मुळ मालक सुर्यभान बाबु नवले यांची सही आहे तसेच साक्षीदारांच्या सहया आहेत. सदर दस्त हा १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर केलेला आहे. त्यास **वस्तु 'ब'** देण्यात येते. अनिल शिंदे यांच्या कार्यकाळात मी अधिक्षक होतो. सदरचा करारनामा माझ्या समक्ष झालेला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

२. सुर्यभान नवले यांना वेळोवेळी रक्कम देण्यात आली. त्याबद्दलचा खातेउता-याची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

**प्रस्तुत दस्तऐवजाच्या अनुषंगाने मुळ दस्त अभिलेखावर पडताळणीसाठी हजर करेपर्यंत सरतपास तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्विकृती,

दि. १३/०३/२०२५

(दि.ह. दाभाडे)
३रे सह.दि. न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर.

नि.दि.दावा क्र.६२१ /२०२०
नि. क्र.२८

निं.दि.दावा क्र.६२१ /२०२०

नि. क्र.२८

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपासणी विधीज्ञ श्री. यांच्याकडून</u>**

२.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

दि. १३/०३/२०२५

(दि.ह. दाभाडे)
३रे सह.दि. न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर.